माहिती तंत्रज्ञानाचा ग्रामीण स्त्री जीवनावर झालेल्या परिणामांचा समाजशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ परभणी जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मानव विज्ञान शाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच.डी. पूर्व संशोधन आराखडा

संशोधिका

शिवराणी भिमराव भुस्से

मार्गदर्शक

प्रा.डॉ. संदीप रामराव गोरे

प्राध्यापक व समाजशास्त्र विभागप्रमुख

श्री योगानंद स्वामी महाविद्यालय वसमत

जिल्हा हिंगोली

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

जून २०२३

प्रस्तावना

परिवर्तन ही व्यक्ती जीवनाची प्रथम पायरी आहे. मानवामध्ये परिवर्तनाची प्रक्रिया सातत्याने सक्रिय असल्यामुळे कधी प्राणीसदृश्य असणारा मानव आज पूर्णपणे बदलला आहे. प्राचीन काळी व्यक्ती किंवा नातेवाईकांना प्रत्यक्ष भेटण्याचा एकमेव मार्ग पायी प्रवास करणे हाच होता. काळ बदलत गेला तसतसे संपर्क साधनेही बदलत गेली. पुढील काळात निरोप घेऊन 'दूत' येत असत, राजा-महाराजांच्या काळात निरोप देण्याचे काम कबूतराच्या माध्यमातून केले जात होते. ब्रिटीश भारतामध्ये पोष्ट ऑफिस, तार सेवा, टेलिग्राफ या साधनांनी कित्येक वर्ष संवादाचा दुवा बनून काम केले.

जगातील सर्वात सुंदर व सर्वात मोठी असलेली आपली भारतीय राज्यघटना व या राज्यघटनेच्या चार आधारस्तंभापैकी एक स्तंभ म्हणजे माहिती तंत्रज्ञान होय. या माहिती तंत्रज्ञानाचे दोन भागात विभाजन करता येते. एक प्रिंट मिडिया व दुसरे इलेक्ट्रॉनिक मिडिया प्रिंट मिडियामध्ये वर्तमानपत्र, विविध अंक, साप्ताहिक, मासिक, त्रैमासिक, सामाहिक, वार्षिक, आकाशवाणी यांचा समावेश होतो. तर इलेक्ट्रॉनिक मिडियामध्ये चित्रपट, टि.व्ही कॅम्प्यूटर, लैपट, मोबाईल यांचा समावेश होतो. २१ व्या शतकामध्ये माहिती तंत्रज्ञानाची झपाट्याने वाढ झाल्यामुळे या युगाला 'माहिती तंत्रज्ञानाचे युग म्हणून मान्यता पावले आहे. विज्ञानाच्या प्रगतीचा हा अतिउच्च अविष्कार मानला पाहिजे. शालेय जीवनात आपण 'विज्ञान शाप की वरदान' या विषयावर निबंध किंवा अनेक भाषणे ऐकली आहेत, पण सद्या माहिती तंत्रज्ञान चांगले आहे की घातक आहेत यावर सर्वच स्तरावरील विचारवंतामध्ये गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे.

आजच्या ह्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात जग हे सोशल मिडिया भोवती फिरत आहे. संगणक, स्मार्टफोन आणि इंटरनेटने सर्व घटकांना संपूर्णरित्या व्यापून टाकले आहे. आजच्या घडिला इंटरनेट हा जीवनाचा एक प्रमुख भाग झाला आहे. जिथे इंटरनेटचा वापर होत नाही असे क्षेत्र म्हणजे अपवादच म्हणावे लागेल. माहितीची देवाण-घेवाण. शिक्षण, करिअर, नोकरी, व्यवसाय संवाद, संपर्क, मार्केटिंग, कृषी इत्यादी सारख्या घटकांना इंटरनेटने व्यापून टाकले आहे. त्यामुळे इंटरनेटचे जग अधिक व्यापक होत चालले आहे. इंटरनेटवर आधारित जी माध्यमे आहेत त्यासाठी 'सोशल मिडिया' किंवा 'समाज माध्यम' हा शब्द वापरला जातो. सोशल मिडिया दोन अक्षरी शब्द असला तरी त्यांची व्याप्ती मात्र अथांग महासागरासारखी आहे. फेसबुक, ट्विटर, व्हाट्सअ‍ॅप, युट्युव, पिंटरेस्ट स्काईप, इंस्टाग्राम, टिक टॉक इत्यादी साधनांचा समावेश समाज माध्यमामध्ये होतो. सोशल मिडियाने जात, पात, वर्ग, वशं गरीब, श्रीमंत अशी सर्व बंधने तोडून सर्वांना समान पातळीवर आणले आहे. समाज माध्यमांनी मानवाच्या जीवनाला नवी गती, नवी दिशा आणि नवे आयाम देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

'ट्राय' च्या ताज्या अहवालानुसार भारतात १ अब्ज १४ कोटी ४१ लाख ७८ हजार ९६ एवढी मोबाईलची संख्या आहे. यापैकी सुमारे ७४ कोटी ३१ लाख ९० हजार इंटरनेट युजर्स आहेत. म्हणजेच जगात इंटरनेटच्या वापरामध्ये 'भारत दुसऱ्या' स्थानी आहे. करोना संकटाच्या काळात ऑनलाईन शिक्षणाच्या धोरणामुळे इंटरनेट वापरण्याचे प्रमाण तब्बल ७२ टक्क्यांनी वाढले, तर शैक्षणिक अ‍ॅप्स डाऊनलोडिंगचे प्रमाण तब्बल १२८ टक्क्यांनी वाढले आहे. दर महिन्याला ग्रामीण भागात इंटरनेट वापरण्याचे प्रमाण शेकडा ४५ टक्क्यांनी वाढत आहे, तर हाच दर शहरी भागात ११ टक्क्यांनी वाढत आहे. ३८ टक्के इंटरनेट वापरणारे युजर्स हे १२ वर्षांच्या पुढील आहेत. तर ३.८५ कोटी युजर्स

हे ५ ते १२ वर्षाच्या आतील आहेत. लहान मुले आणि गृहिणी या इंटरनेटचे नवीन ग्राहक आहेत. ८४ टक्के इंटरनेटचा वापर हा मनोरंजनासाठी केला जातो.

घराघरात तासनतास टीव्ही समोर बसलेले आबालवृद्ध, मालिकांमध्ये डुबलेला मोठा महिलावर्ग, कार्टूनमध्ये हरवलेली चिमुरडी, सोशल नेटवर्किंग साइटवर चॅटिंग वा सर्फिंग करणारी तरुण पिढी आणि मोबाईलच्या विश्वात भान हरपलेली सर्वच वयोगटातील व्यक्तीना समाज माध्यमांचे व्यसन लागलेले दिसून येते. संपर्क व दळणवळण साधनांतील वेगवान तांत्रिक बदलांमुळे सर्वच माध्यमांचे स्वरूप बदलून ती बहुआयामी बनले आहेत. या दळणवळणाच्या व माध्यम क्रांतीचे अनेक सकारात्मक व नकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. यामध्ये ८ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुले सुमारे ६ तासांपेक्षा अधिक वेळ टीव्ही पाहणे, कम्प्युटर हाताळणे, व्हिडोओ गेम खेळणे, फेसबुक, ट्विटर, व्हाट्सॲप, युटयूब, पिंटरेस्ट, स्काईप, इंस्टाग्राम, टिक टॉक इत्यादीमध्ये व्यस्त असतात.

२१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे आणि समाज माध्यम क्रांतीचे म्हणून ओळखले जाते. परंतु या समाज माध्यमांच्या प्रगतीमुळे समाजजीवन संकुचित बनत चालले आहे. संकुचित दोन अर्थानी की समाज एकमेकांजवळ येत चालला तसतसे त्यांची दृष्टी लहान आणि आत्मकेंद्री होत आहे. प्रारंभी माध्यमे ही समाजाच्या कुतूहलांचा व औत्सुक्याचा विषय ठरली. त्यामुळे समाजाने गरज म्हणून परिवर्तनाचा स्वीकार केला. परंतु समाज माध्यमे कुटुंब, समाज आणि राष्ट्रांच्या डोकेदुखीचा विषय ठरली आहेत. समाज माध्यमांची स्वैर हाताळणी आणि त्याचा विघातक, आत्मकेंद्री उपयोग हा अलीकडच्या काळात जागतिक समस्या म्हणून समोर येईल यात शंका नाही. माध्यम गरज म्हणून उपयोगात आणली तर त्यांचा विधायक उपयोग होऊ शकतो; परंतु माध्यमांच्या आहारी जाणारा समाज स्वकेंद्री बनत आहे. स्वरंजनाचे ते निरर्थक, वेळखाऊ व्यसन अत्यंत घातक, मानवी संवेदना व मानवी विवेक बधीर

करणारे आहे. माध्यमांच्या अतिरिक्त व बेजबाबदार वापराची सवय कमी झाली नाही तर अलीकडच्या काळात संपूर्ण तरून पिढी व समाजाचे मानसिक संतुलन ढासाळण्याची शक्यता आहे. माध्यमांच्या अतिरिक्त वापरांचे परिणामही सद्या दिसू लागले आहेत. यामध्ये भावनिक उन्माद, अस्वस्थता, निराशा, चिडचिडेपणा, मेंदूविकार, डोळ्याचे विकार, मान व कंबरेचे आजार तणाव इत्यादी समस्यांने अनेकांना जीव गमवावा लागला आहे. व्यक्तीला माध्यमाची एवढी सवय लागली आहे की, मोबाईल व स्मार्टफोन शरीराचा एक भाग बनली आहेत.

१९९० च्या दरम्यान मोबाईल, विविध वाहिन्या आणि इंटरनेट यांचे युग अवतरले तेव्हा ती सर्वांना परवडणारी नव्हती. परंतु इ.स. २००० च्या नंतर समाज माध्यमांची जागतिक पातळीवर मोठी बाजारपेठ निर्माण झाल्यामुळे ती सामान्य व्यक्तीना परवडतील अशा किमतीत उपलब्ध होत गेली. त्यामुळे व्यक्ती व समाजाचे दैनंदिन दिनचर्या बदलून गेली. त्यामुळे व्यक्ती व्यक्तीमधील सिस्त, गेरसमज, जातीय तेढ, कर्मकांडाला चालना व चुकीची माहितीचा प्रचार आणि प्रसार करण्याला पेव फुटले आहेत. यामुळे माध्यमे अनियंत्रित आणि निरंकुश बनत आहेत. सत्यता, दर्जा, ज्ञान यापासून कोसो दूर असलेली माध्यमे समाजाला कशी दिशा दाखविणार? हा प्रश्न निर्माण झाला आहे. जगाच्या बहुतेक राष्ट्रांतील नागरिकांना सर्वप्रकारचे स्वातंत्र्य आहे त्यामुळे त्यांना समाज माध्यमांवर विचार, भावना मांडण्याचे खुले व्यासपीठ स्थापन झाले. ही बाब अतिशय गौरवास्पद आहे. त्या ठिकाणी चाललेला तात्काळ असा क्रियावादी व प्रतिक्रियावादी यांच्यातील अतार्किक, विवेकशून्य संघर्ष उबग आणणारा आहे. माध्यमांमुळे छुपे शीतयुद्ध मुक्त समाज रोव्ही वाहिल्या न्यूज चैनल्स त्यांचा अहमपणा, वाढती स्पर्धा यामुळे माध्यमे भांडवलशाही व राज्यव्यवस्थेचे हस्तक बनले आहेत.

अनेक संकटे दुःख घटना, भक्तिभाव, युद्धजन्य परिस्थिती, भीषण घटना इत्यादींचे समाजात इव्हेंट होऊ लागले आहेत. पारंपरिक दुष्मन असलेल्या भारत आणि पाकिस्तान यांच्यात निर्माण झालेला संघर्ष त्यांची माध्यमात उमटलेली प्रतिक्रिया पाहिली की या पुढील जग व त्यातील राष्ट्रसंघर्ष कोणत्या वळणावर असणार आहे याची जाणीव झाल्याशिवय राहत नाही. राष्ट्रहिताच्या अनेक गोपनीय गोष्टी या माध्यमांनी तर्काच्या आधारे उघड केल्या आहेत. त्यामुळे माध्यमांचा देशाच्या सुरक्षेलाच धोका निर्माण झाला आहे. स्वत: समाज माध्यमेच सीमेवर युद्ध लढत आहेत असा ताव आर्वभिाव आणत आहेत. माध्यमांच्या या भडीमारामुळे तरुण व किशोरवयीन मुले आणि त्यांचे पालकही ग्रासले आहेत, त्यामुळे माध्यम कोणत्या केळी? कोणत्या प्रसंगी कसे वापरायचे कोणतेही भान आणि तारतम्य कोणालाही राहिलेले नाही. माध्यमांमुळे समांतर आभासी जग निर्माण झाले आणि आजची पिढी वास्तवापेक्षाही त्या आभासी जगात रममाण झालेली आहे.

खेळणे आणि बागडण्याचे वय असते त्याच वयात मुले मोबाईलच्या आभासी खेळात मग्न झाली आहेत. मुलांचे मोबाईल वरील स्क्रीन हे त्यांचे प्लेग्राउंड बनल्याने ते दिवस रात्र ब्लू व्हेल, पॉकेमॉन, पब्जी आणि फोर्ट नाईट इत्यादी खेळ खेळतात. अशा खेळाची सवय ही मादक पदार्थापेक्षाही घातक असून यातून हजारो किशोरवयीन मुलांचे जीवन उदवस्त झाले आहे. यातून त्यांच्यात चिडचिडपणा निर्माण होऊन आई व पालकाचे न ऐकणे तसेच शिक्षकांच्या शिकवणिकडे दुर्लक्ष करणे, वेळप्रसंगी शिक्षकांनासुद्धा उध्दट बोलणे असे प्रकार सरासपणे घडत आहेत. वर्ग चालू असताना अनेक मुले मोबाईलवर गेम खेळणे, चॅटिंग करणे किंवा अश्लील व्हिडीओ पहात असतात ८ ते १८ वयोगटातील मुले टीव्ही पाहणे, कम्प्युटर हाताळणे, फेसबुक, ट्विटर, व्हाट्सअॅप, युट्युब, पिंटरेस्ट, स्काइप, इंस्टाग्राम, टिक टॉक इत्यादीचा नियमबाहय वापर करणे तसेच ब्लू व्हेल, पॉकेमॉन, पब्जी आणि फोर्ट नाईट या

सारख्या व्हिडीओ गेममुळे त्यांच्या बुद्धिवर विपरित परिणाम झाला असल्याचे अनेक मानसरोग तज्ज्ञाचे मत आहे.

संशोधनाचा अर्थ

संशोधन म्हणजे तथ्य व तत्त्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सक किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत पद्धतशीर केलेले परिश्रम होय. अध्ययन विषयक जे निष्कर्ष व सिद्धांत मान्यवर किंवा स्वीकृत ठरले आहे. त्याचे प्रमाण्य पुन्हा पुन्हा परिक्षण पाहण्याचे कार्य संशोधनात केले जाते. नव्याने उजेडात आलेल्या तथ्यांच्या आधारे प्रस्थापित स्वीकृत निष्कर्ष व सिद्धांताचे पूर्ण प्रशिक्षण करण्याच्या हेतूने चिकित्सक व सखोल चौकशी किंवा प्रयोग करणे म्हणजे संशोधन होय.

संशोधनाच्या व्याख्या (Definition of Research)

पी.व्ही.पंग

यांच्या मते, "संशोधन म्हणजे नवीन तथ्ये शोधण्यासाठी अथवा जुन्या तथ्यांचे परिक्षण करण्यासाठी या तथ्यांमधील अनुक्रम, परस्पर संबंध, कार्यकारण भाव या विषयी स्पष्टीकरण आणि सामान्यीकरण प्रस्थापित करण्याची एक पद्धतशीर प्रक्रिया होय."

व्ही.पी.मिचल

यांच्या मते, “व्यवस्थापनातील समस्यांची पद्धतशीर तपासणीची प्रक्रिया म्हणजे संशोधन होय.'

अरविंद चौधरी

यांच्या मते, “व्यवस्थापकीय घटनांचा अभ्यास, नवीन तथ्यांचा शोध व जुन्या तथ्यांचे परीक्षण करण्याची पद्धती म्हणजे संशोधन होय."

संशोधन समस्या

वैज्ञानिक संशोधनात समस्या निर्धारण किंवा समस्यासूत्रण ही सामाजिक संशोधनाची प्रथम पायरी होय. सामाजिक समस्या अतिशय जटिल स्वरुपाच्या असतात. कारण समस्यांना अनेक पैलू असतात. त्यापैकी कोणत्या तरी एका पैलूची निवड संशोधन अध्यनासाठी करावी लागते. अशा प्रकारच्या संशोधनाच्या सामान्य विषयक्षेत्राचे विशिष्ट संशोधन समस्येत रुपांतर करणे म्हणजे समस्यासूत्रण होय. संशोधन समस्या संशोधनकर्त्यास जाणवणारी एक सैध्दांतिक किंवा व्यावहारिक अडचण होय. साधारणत: समस्यासूत्रणात काही मूलभूत प्रश्नांचा विचार करणे आवश्यक असते. जसे कशाचा अभ्यास करावयाचा आहे? अभ्यासाचे क्षेत्र कोणते? आदी बाबींचा अभ्यास करणे यामध्ये अपेक्षित असते.

माहिती तंत्रज्ञानाची व्याप्ती एवढी वाढली आहे की, जगाच्या कानाकोपऱ्यात घडणाऱ्या घटनेचा सकारात्मक व नकारात्मक प्रभाव क्षणार्धात सर्व जगावर पडत आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे घरबसल्या ऑनलाईन शिक्षण घेणे, स्वस्तात माहिती गुगलवर सर्च करणे, तज्ज्ञ गुरुंचे व्हिडोओ पाहणे, प्रादेशिक, राज्य तसेच इतर राष्ट्रांच्या विद्यार्थ्यांबरोबर सहजपणे मैत्री करणे, संवाद साधणे आणि वैचारिक देवाण-घेवाण करणे शक्य झाले. प्रगत समाज माध्यमांमुळे राष्ट्र राज्यांच्या सीमा अंधूक होऊन जगाचे रूपांतर खेड्यात झाल्याने राष्ट्रा-राष्ट्रांतील धर्मभेद, पंतभेद, वर्णभेद, जातीभेद या संकल्पा काळओघात माघे पडल्या आहेत. तसेच खेड्यातील विद्यार्थी घरबसल्या समाज माध्यमांच्या क्रांतीमुळे देश विदेशात ऑनलाईन शिक्षण घेत आहे. असे असले तरी समकालीन स्थितीमध्ये किशोरवयोन मुलांमध्ये जाणवणारा चिडचिडपणा, आत्मकेंद्री वृत्तीत झालेली वाढ, वाढती व्यसनाधिनता, दृष्टीवर झालेला परिणाम, अभ्यासाकडे होणारे दुर्लक्ष, शिक्षक आणि विद्याथ्र्यांच्या संवादात घट, परीक्षाच्या भितीतून होणाऱ्या आत्महत्या, वाढती गुन्हेगारी, कौटुंबिक वातावरणात वाढता

ताणतणाव, नैतिक मूल्यांचा झपाट्याने होणारा ऱ्हास इत्यादी समस्या निर्माण होण्यास समाज माध्यम्य कारणीभूत आहेत का? यांचा अभ्यास करण्यासाठीच **माहिती तंत्रज्ञानाचा ग्रामीण स्त्री जीवनावर झालेल्या परिणामांचा समाजशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ परभणी जिल्हा** हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधनाची उदिष्ट्ये

१. परभणी जिल्ह्याच्या भौगोलिक, ऐतिहासिक, राजकीय, औद्योगिक, शैक्षणिक, लोकसंख्या इत्यादी घटकांचा अभ्यास करणे.

२. माहिती तंत्रज्ञानाचा उदय व विकासाला कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा आढावा घेणे.

३. माहिती तंत्रज्ञानाचा ग्रामीण भागातील समाजजीवनावरील परिणामाचा अभ्यास करणे

४. समाज माध्यमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.

५. समाज माध्यम विद्यार्थाच्या दृष्टिकोनातून तारक आहेत का? मारक आहेत? यांचा शोध घेणे.

संशोधनाची गृहीतके

१. परभणी जिल्ह्याला भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली दिसून येते.

२. माहिती तंत्रज्ञानाने अवकास, भूमी आणि पाणी या सर्वच घटकांवर मात करण्यात यशस्वी झाले आहे.

३. माहिती तंत्रज्ञानाचा ग्रामीण भागातील समाजजीवनावर नकारात्मक व सकारात्मक परिणाम झालेले आहेत.

४. समाज माध्यमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर खूप मोठ्या प्रमाणात परिणाम झाले आहेत.

५. समाज माध्यम किंवा माहिती तंत्रज्ञानामुळे विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती झपाट्याने होत असली तरी त्यांचे नकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांवर जास्त प्रमाणात होत आहेत.

संशोधनाचे महत्त्व

संयुक्त राष्ट्र संघटनेने अलिकडेच एक 'अहवाल' प्रसिद्ध केला, त्यानुसार भारत जगातील सर्वात तरूण देश असल्याचे स्पष्ट झाले. १० ते २४ वर्षे वयोगटातील भारतात ३५.६ कोटी लोकसंख्या आहे. त्या खालोखाल अनुक्रमे चीन २६.९ कोटी, इंडोनेशिया ६.७ कोटी, अमेरिका ६.५ कोटी, पाकिस्तान ५.९ कोटी, नायजेरिया ५.७ कोटी, ब्राझील ५.१ कोटी या प्रमाणात जगात तरुणाची लोकसंख्या आहे. भारताचे राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी भारतातील तरुण लोकसंख्येची झपाटयाने वाढ होत असल्यामुळेच २०२० मध्ये भारत महासत्ता होईल असे म्हटले होते परंतु सध्याची परिस्थिती अतिशय प्रतिकूल अशीच आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे तरुणाविषयी शासनाचे चुकीचे धोरण, मूल्य शिक्षणाचा होत असलेला ऱ्हास, वाढती व्यसनाधिनता, गुन्हेगारीत होत असलेली वाढ आणि समाज माध्यमांचा मोठ्या प्रमाणात गैरवापरामुळे भारताची तरुणाई शतीग्रस्त झाली आहे. त्यामुळे अंधकारमय वातावरणात चाचपडणाऱ्या तरुणाईला योग्य मार्ग दाखविण्यासाठी संशोधनाला चालना मिळणे महत्त्वाचे आहे. यासाठीच **माहिती तंत्रज्ञानाचा ग्रामीण स्त्री जीवनावर झालेल्या परिणामाचा समाजशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ परभणी जिल्हा** हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

संशोधन कार्याला निश्चित दिशा प्राप्त होण्यासाठी संशोधनाच्या कार्यक्षेत्राला मर्यादा असणे आवश्यक आहे. संशोधनाला मर्यादा नसेल तर संशोधन हे मूळ गृहीतकापासून दूर जात असते. त्यामुळे प्रस्तुत अध्ययनासाठी संशोधनाचे कार्यक्षेत्र

परभणी जिल्हा निवडला आहे. अपवादात्मक परिस्थितीमध्ये इतर काही बाबींचा संशोधनामध्ये उल्लेख किया संदर्भ येऊ शकतात. ही या संशोधनाची व्यापती किंवा मर्यादा आहे.

नमुना निवड

समुहाच्या सर्व सदस्याची अथवा एकमेकांशी संपर्क स्थापित करून माहिती गोळा करणे या पद्धतीला जनगणना पद्धती असे म्हणतात. पण जनगणना पद्धत समूह लहान असेल तर शक्य असते. दुसऱ्या पद्धतीत समुहाचे प्रतिनिधित्व सदस्य म्हणून माहिती देतो, त्या पद्धतीला नमुना निवड असे म्हणतात..

नमुना निवडीच्या व्याख्या

गुडे आणि टरे

यांच्या मते, "नमुना त्यातील नावाप्रमाणे विस्तृत समुहाचा लोक प्रतिनिधी असतो.'

यंग

यांच्या मते, "एकक सांख्यिकीय नमुना समुहाच्या किवा समग्रातून निवडला जातो त्याला नमुना निवड असे म्हातात."

प्रा. डॉ.डी.डी.भक्कड

यांच्या मते, "संशोधनात समग्राबाबत काही अनुमान बांधण्याकरता समग्रामधून पाहणीसाठी एक भाग निवडला जातो, त्यास नमुना निवड असे म्हणतात.'

नैसर्गिक व सामाजिक संशोधनामध्ये संभाव्यता व गैर संभाव्यता या दोन पद्धतीचा समावेश होतो. संभाव्यता ही नमुना निवड पद्धत मूर्त किंवा वैज्ञानिक पद्धतीशी संबंधीत आहे. तर गैर संभाव्यता नमुना निवड पद्धत ही अमूर्त किंवा सामाजिक शास्त्राशी संबंधित आहे. प्रस्तुत संशोधनात वेळप्रसंगी संभाव्यता व गैर संभाव्यता या पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

माहिती तंत्रज्ञानाचा ग्रामीण स्त्री जीवनावर झालेल्या परिणामाचा समाजशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ परभणी जिल्हा या विषयाचा अभ्यास करण्यासाठी परभणी जिल्ह्यातील परभणी, मानवत, सेलू, गंगाखेड आणि पूर्णा हे तालुके निवडण्यात आले आहेत. यासाठी संभाव्यता नमुना निवडीतील लॉटरी पद्धतीने प्रत्येक तालुक्यातून १० गावे निवडली असून प्रत्येक गावातून ६ या प्रमाणात तालुक्यातून ६० उत्तरदाते निवडले जाणार आहेत, म्हणजेच ५ तालुक्यातून ३०० उत्तरदात्याकडून मुलाखती व अनुसूचि भरून घेऊन माहिती संकलीत करण्यात येईल.

तथ्य संकलन पद्धती

तथ्य संकलन म्हणजे एक प्रकारचा दस्तऐवज असते. ज्यात प्रकाशित व अप्रकाशित लिखानाच्या सर्वेक्षणाबद्दल माहिती दिलेली असते. ग्रंथालयामध्ये माहितीच्या स्वरूपावरून ग्रंथ पुस्तके, मासिके, वर्तमानपत्र, शोध निबंध उपलब्ध असतात व संशोधक त्याचे वाचन करून त्याची मांडणी त्यांच्या संशोधनात करतो त्याला साहित्यीक सर्वेक्षण असे म्हणतात. साहित्यीक सर्वेक्षण करताना संशोधक मुलाखत घेऊन सुद्धा आपले विचार सर्वेक्षणाद्वारे स्पष्ट करत असतो. प्रकाशित लिखाणाच्या माध्यमातून सर्वेक्षण करून संशोधक स्वतः च्या संशोधनाला चालना देत असतो. साहित्यिक सर्वेक्षण संशोधनात खूप महत्त्वाचे ठरते.

प्राथमिक तथ्य संकलन

अभ्यासासाठी निवडलेल्या प्राथमिक तथ्य माहितीत प्रश्नावलीच्याद्वारे नमुना निवड पद्धतीने नांदेड जिल्ह्यातील आवश्यक ती माहिती संग्रहीत करण्यात येईल. त्याच बरोबर उत्तरदात्यांकडून माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने अनुसूची व प्रश्नावली भरून घेण्यात येईल.

द्‌वितीय तथ्य संकलन

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक तथ्या बरोबर द्‌वितीय तथ्यांचा आधार घेण्यात येईल. विषयाच्या अनुषंगाने केंद्र व राज्य सरकारचे वेळोवेळी प्रसद्धि केलेले अहवाल, आर्थिक पाहणी अहवाल, जनगणना, आयुक्तालयांचे सांख्यिकीय गोषवारा, मानव विकास अहवाल, नांदेड जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन अहवाल, जिल्हा गॅझेटिअर स्थल दर्शक नकाशे, गुगल, वेबसाईट, विविध संशोधन पत्रिका, नियतकालीके, मासिके, ग्रंथ व वृत्तपत्र यातून प्रसिद्ध झालेल्या माहितीचा उपयोग प्रबंध लेखनासाठी करण्यात येईल. सांख्यिकीय संशोधनात निर्देशांक प्रतिशत प्रमाण, वृद्धिदर, सारणीच्या साधनाचा विशेषतः उपयोग करण्यात येईल.

संशोधनाचा आराखडा

संशोधनातील एक प्रमुख पायरी म्हणजे संशोधन आराखडा होय. व्यक्तीला कोणतेही कार्य व्यवस्थितपणे करण्यासाठी सर्वप्रथम त्या कार्याचा आराखडा करावा लागतो. उदा. नवीन इमारत बांधण्यापूर्वी त्या इमारतीचा आराखडा आपण कागदावर तयार करतो. तसेच शालेय सहल किंवा प्रवासी यात्रेची सफर यशस्वी पार पाडण्यासाठी त्या सहलीचा आराखडा तयार करावा लागतो. संशोधनात आराखड्याला विशेष महत्त्व आहे. कारण त्या आधारे प्रस्तुत प्रकरणाचा विषय, विषयाची व्याप्ती, विषयाच्या माहिती संकल्पना बाबत अधिक तपशील मिळतो. संशोधन कार्यात संशोधन आराखडा ही प्रमुख पायरी आहे. संशोधकाला आपल्या संशोधनात पद्धतशीर नियोजन करावे लागते. त्याची रूपरेषा ठरवावी लागते, संशोधन मांडणीचे स्वरूप निश्चित व स्पष्ट करावे लागते. संशोधन आराखडा तयार करताना त्यात विषय उद्दिष्ट, अध्ययन क्षेत्र, कालावधी, नमुना निवड पद्धती ठरविणे, तथ्य संकलनाची साधने ठरविणे आणि संशोधन कार्याचा तपशील ठरविणे गरजेचे आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना व संशोधन पद्धती

प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे : परभणी जिल्हयाची पार्श्वभूमी

प्रकरण चौथे : माहिती तंत्रज्ञानाचा उदय व विकास

प्रकरण पाचवे : प्रस्तुत माहितीचे अर्थनिवर्चन

प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी

संदर्भग्रंथ सूची

१. रॉयल सोसायटी फॉर पब्लिक हेल्थ, ब्रिटीश संस्थेने प्रसिद्ध केलेले स्टेटस ऑफ माईंड, अध्ययन

२. प्रफुल्ल सुतार, सोशल मीडिया, डिजिटल दुनिया, मल्टीव्हर्सिटी पब्लिकेशन, पुणे

३. जयमती दळवी, भारतातील प्रसार माध्यमे काल आणि आज, डायमंड प्रकाशन

४. डॉ. प्रदीप आगलावे, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्‌या प्रकाशन, नागपूर

५. निताळे विनोद व भटकर सुधीर, माध्यम आणि सामाजिक बदल, जवळगाव

६. डॉ. धनराज धनगर, सोशल मिडिया अँड सोसायटी, स्वातीधन प्रकाशन

७. व्ही. बी. पाटील, संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, प्रथमावृत्ती

८. पी. एल. भांडारकर, सामाजिक संशोधन पध्दती, हिमालय पब्लिकेशन हाऊस

संशोधिका **मार्गदर्शक**

शिवराणी भिमराव भुस्से **प्रा.डॉ. संदीप रामराव गोरे**

प्राध्यापक व समाजशास्त्र विभागप्रमुख

श्री योगानंद स्वामी महाविद्‌यालय वसमत

जिल्हा हिंगोली